## <u>किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१७/२०१८ मधील</u>

## <u>नि.१६ वरील आदेश</u>

(पुंडलिक येसुमाळी वगैरे वि.रामचंद्र माळी वगैरे)

प्रस्तुतचा अर्ज जाबदार नं.१ ते ३ यांनी त्यांचेविरुद्ध विनाम्हणणे झालेला आदेश सेट असाईड होवून मिळणेकामी केलेला आहे.

२. प्रस्तुतच्या अर्जामध्ये जाबदार नं.१ ते ३ यांनी असे कथन केले आहे की, जाबदारांना मुदतीत म्हणणे दाखल करता आले नाही व न्यायालयीन कामकाज बंद असल्याने व काही इतर अपरिहार्य कारणामुळे त्यांना म्हणणे दाखल करता आलेले नाही. तरी, त्यांना म्हणणे दाखल करणेस संधी मिळावी अशी विनंती करण्यात आली.

३. प्रस्तुतच्या अर्जास अर्जदाराचे वकील यांनी नि. १८ अन्वये त्यांचे म्हणणे दाखल करुन अर्जातील कथने नाकारली व त्यांनी असे कथन केले की जाणीवपूर्वक ३ वर्षांपेक्षा अधिक कालावधी जाबदारांनी म्हणणे देण्याकरिता लावला आहे. तसेच, अर्जातील कारणे संयुक्तीक नाहीत व कारोनाची महामारी २०२० नंतर चालू झाली व त्याआधी म्हणणे देणे शक्य होते. या सर्व कारणास्तव अर्ज नामंजुर करणेची विनंती त्यांनी केली व मंजुर करावयाचे झाल्यास ५०,०००/- रुपये कॉस्ट लावण्यात यावी अशी विनंती अर्जदारातर्फे करण्यात आली.

४.      दोन्ही बाजुंचे विद्वान विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. त्यांनी अर्जातील व म्हणण्यांतील कथानांच्या अनुषंगाने युक्तीवाद केला.

५.      जरी कोरोनाची महामारी मार्च २०२० पासून चालू झाली आहे तरी देखील त्यापूर्वी जाबदारांना म्हणणे देण्यास कोणतीही अडचण नव्हती. परंतु, नैसर्गिक न्यायाचा विचार करता, अर्ज गुणदोषावर चालणे अत्यंत आवश्यक असल्याने अर्ज मंजुर करणे न्यायोचित होणार आहे. म्हणणे देताना झालेला विलंब विचारात घेता कॉस्ट लावणे देखील न्यायोचित आहे. सबब, मी खालील आदेश पारित करतो.

## आ दे श

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. जाबदार नं. १ ते ३ यांचेविरुद्ध झालेला विना म्हणणे आदेश सेट असाईड करण्यात येतो. जाबदारांनी अर्जदारांना रुपये ३००/- कॉस्ट पुढील तारखेपर्यंत अदा करावी असा आदेश देणेत येतो.

सही/-

**पलुस.** **(नि.दि. रुद्रभटे )**

**दिनांक- ०४/१२/२०२१** **सह. दिवाणी न्यायाधीश क.स्तर पलूस**

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Pravin G. Sabale |
| Court | : | Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Palus |
| Date | : | 04/12/2021 |
| Signed by the Presiding Officer on | : | 04/12/2021 |
| Uploaded on | : | 04/12/2021 |